**MHBI170001512019**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १२.०३.२०१९ |
| नोंदणी तारीख | : | १३.०३.२०१९ |
| निकाल तारीख | : | ३०.०३.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०७ ०० १८ |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड यांचे न्यायालयात</u>**

(पिठासन अधिकारी – श्री. विष्णु द. गिते)

**<u>फौ. कि. अर्ज. क्र.१५/२०१९</u>** **<u>निशाणी ३२</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | **सुलभा भद्री बारगजे,**<br>वय ३३ वर्षे, व्यवसाय – घरकाम. | |
| २. | **अभिषेक भद्री बाजगजे,**<br>वय १० वर्षे,<br>अ.पा.क. आई सुलभा भद्री बारगजे,<br>दोघे राहणार – चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड. | **....अर्जदार** |
| | **<u>विरुध्द</u>** | |
| | **भद्री बापुराव बारगजे,**<br>वय ३८ वर्षे, धंदा – शेती व मुकादम,<br>राहणार – चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड. | **....गैरअर्जदार** |

==============================================

अर्जदारातर्फे विधीज्ञ – श्री. बी. के. तिडके.

गैरअर्जदार तर्फे विधीज्ञ – श्री. टी. ए. शेख.

==============================================

**न्या य नि र्ण य**

**(घोषणा तारीख – ३०/०३/२०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

**<u>अर्जदारांचे थोडक्यात कथन –</u>**

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार नं.१ ही गैरअर्जदाराची पत्नी असुन त्यांचे लग्न हिंदु धर्मशास्त्र पद्धतीप्रमाणे चिंचवण येथे दि.२२/०४/२००४ रोजी झालेले आहे. लगनंतर अर्जदार नं.१ ही गैरअर्जदाराकडे नांदावयास गेली असता सुरुवातीला २ ते ३ वर्षे गैरअर्जदारांनी तिला चांगले सांभाळले, परंतु त्यानंतर गैरअर्जदार तसेच त्याचे

आई–वडील हे अर्जरादर क्र.१ हिचा "लग्न व्यवस्थीत करुन दिले नाही, तु काळी आहेस" असे म्हणुन नेहमी त्रास देवु लागले आणि जमीन घेण्यासाठी रु.१,००,०००/– ची मागणी करुन जाच–जुलुम करण्यास सुरुवात केली.

३. अर्जदार नं.१ हिस गैरअर्जदारापासुन अर्जदार नं.२ हा जन्मलेला असून त्याला देखील गैरअर्जदार व्यवस्थीत सांभाळीत नाही. अर्जदार नं.१ ने तिला होणारा त्रास कमी होत नसल्याने तसेच पैश्याची मागणी होवु लागल्याने सदरील बाब तिच्या आई–वडीलांना सांगितली असता अर्जदाराच्या आई–वडीलांनी गैरअर्जदाराची भेट घेवून त्यांच्या परिस्थीती बद्दल समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु गैरअर्जदार व त्याच्या आई–वडीलांनी अर्जदाराच्या आई–वडीलांना "आम्ही मागितलेली रक्कम देत नाहीत त्यामुळे आम्ही तुमच्या मुलीला संभाळु शकत नाहीत" असे म्हणुन अर्जदार नं.१ हिला मारहाण करुन अर्जदार नं.२ सहीत घरातुन हाकलून दिले.

४. गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबाने अर्जदारास बेकायदेशीर मारहाण करुन घरातुन हाकलून दिले, तेंव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी चिंचवण येथे राहात आहे. अर्जदार नं.१ च्या आई–वडीलांनी तसेच तिच्या नातेवाईकांनी भरपुर प्रयत्न करुन देखील गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबाने अर्जदारास नांदावयास घेवुन जाण्यास स्पष्ट नकार दिला. अर्जदार क्र.१ च्या आई वडीलांची परिस्थीती आतिशय बीकट असल्यामुळे अर्जदार क्र.१ व २ हे सध्या हालाखीचे जिवन जगत असल्याने त्याचा विपरीत परिणाम अर्जदार क्र.२ च्या शिक्षणावर होत आहे. याउलट गैरअर्जदाराचे कुटुंब हे सधन शेतकरी आहे आणि त्यांना मौजे चिंचवण येथे एकत्र कुटुंबाची बागायती जमीन असून ते सदर जमीनी मध्ये ऊस, कापूस, तुर, आशी नगदी पिके घेत आहेत. या पिकांपासून गैरअर्जदार यांना वर्षाकाठी ९ ते १० लाख रुपये उत्पन्न मिळते तसेच गैरअर्जदाराकडे पाच दुभत्या म्हशी असून त्यापासुन त्यांना वर्षाकाठी ४ ते ५ लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार हा ऊसतोड मजुर पुरविण्याचा मुकादम आहे आणि त्यापासुन त्याला वर्षाकाठी ३ ते ४ लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदारास मिळणाऱ्या उत्पन्नाचा व सध्याच्या महागाईचा विचार करता अर्जदार नं.१ व २ यांना प्रतिमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/– पोटगी देण्याची सहज ऐपत गैरअर्जदाराची आहे. सबब, अर्जदारांचा अर्ज खर्चासह मंजुर करुन गैरअर्जदाराकडुन प्रत्येकी प्रतिमहा रक्कम रु.१०,०००/– पोटगी अर्जाच्या तारखेपासुन देण्यात यावी अशी विनंती अर्जदारातर्फे करण्यात आली आहे.

**<u>गैरअर्जदार यांचे थोडक्यात कथन –</u>**

५. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचा लेखी जबाब (नि.क्र.१३) दाखल करुन अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य करुन इतर कथने नाकारली आहेत. गैरअर्जदाराने त्यांच्या लेखी जबाबात कथन केले की, गैरअर्जदार यांनी अर्जदार नं.१ हिला कधीही घरातुन हाकलुन दिले नाही कारण गैरअर्जदारास अर्जदार नं.१ व २ शिवाय इतर कोणीही जवळचे नातेवाईक नाही. गैरअर्जदार हा अर्जदारांना भावी संसारासाठी तसेच मुलाच्या भविष्यासाठी एकत्र येवुन अर्जदार नं.१ हिला सांभाळण्यासाठी तयार आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार नं.१ हिला नांदावयास यावे म्हणून कायदेशीर नोटीसा पाठविलेल्या आहेत, परंतु अर्जदार नं.१ हिने नोटीसला खोटे उत्तर देवुन कोर्टात खोटा अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदार हा त्याच्या थकलेल्या आईचा एकुलता एक मुलगा असुन आईची जबाबदारी त्याच्यावर आहे.

६. गैरअर्जदार यांनी अर्जदार नं.१ च्या नावे दोन एक्कर शेती करुन दिलेली असून त्यातील संपुर्ण नगदी पिकाचे उत्पन्न रुपये दीड लाख प्रतिवर्षी अर्जदार स्वतः घेत आहे. अर्जदार नं.१ चे वडील आणि भाऊ हे गैरअर्जदारास त्याच्या नावावरील असलेल्या शेतीमध्ये वहिती करुन देत नाही या कारणास्तव गैरअर्जदार यांनी अर्जदाराच्या वडील आणि भावा विरुद्ध दिवाणी दावा दाखल केला आहे. सदरील दिवाणी दाव्याचा तसेच नांदावयास यावे म्हणून पाठविलेल्या नोटीसचा राग मनात धरुन अर्जदार नं.१ हिने गैरअर्जदाराविरुद्ध सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती गैरअर्जदारातर्फे करण्यात आलेली आहे.

७. उभय पक्षांचे परस्पर विरोधी कथने आणि अभिलेख पाहता प्रस्तूत अर्जाचे निर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयांसमोर माझे निष्कर्ष व त्याखाली माझी कारणे खालीलप्रमाणे नमूद केली आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराने अर्जदारांचा सांभळ करण्यास व उदरनिर्वाह करण्यास दुर्लक्ष केले हे अर्जदार सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| २. | अर्जदार हे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहेत हे अर्जदार सिध्द करतात काय ? | **अंशतः होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३. | गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन आहे व तो अर्जदार यांना पोटगी देण्यास सक्षम आहे हे अर्जदार सिध्द करतात काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | अर्जदार मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | **अंशतः होकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**कारणमिमांसा**

८. अर्जदाराने तिचे कथनापृष्ठ्यर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१६) दाखल केलेले असून अर्जदारातर्फे सा.क्र.२ नामे संतोष महादेव तांबडे यांचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.२६) दाखल केलेले आहे. इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदाराने दाखल केलेला नाही. पुरसिस (नि.क्र.२७) नुसार दि.०८.११.२०२३ रोजी अर्जदार यांनी त्यांचा पुरावा बंद केलेला आहे. अर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्व शपथपत्र (नि.क्र.३१) दिनांक २३.०३.२०२६ रोजी न्यायनिर्णयाच्या वेळी दाखल केलेले आहे. याउलट दि.०८.११.२०२३ नंतर सदर प्रकरण हे गैरअर्जदारांच्या पुराव्यासाठी प्रलंबित असूनही गैरअर्जदार यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नसल्यामुळे दि.०४.१२.२०२५ रोजी नि.क्र.१ वरील आदेशानुसार गैरअर्जदार यांचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. गैरअर्जदार यांनी कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्व शपथपत्र दाखल केलेले नाही. अर्जदारतर्फे विधीज्ञ बी. के. तिडके यांचा दि.१८.०२.२०२६ रोजी युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदारातर्फे युक्तीवाद करण्यासाठी कोणीही हजर न राहिल्यामुळे दि.१२.०३.२०२६ रोजीच्या नि.क्र.१ वरील आदेशानुसार गैरअर्जदार यांचा युक्तीवाद बंद करण्यात आलेला आहे.

**मुद्दा क्र.१ बाबत**

९. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.१६) मध्ये अर्जातील सर्व कथनांचा पुर्नउच्चार केलेला असल्यामुळे त्या कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ती कथने पुन्हा नमूद करण्याची आवश्यकता नाही. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदार हिला तिच्या अपत्यांसह गैरअर्जदार याने घराबाहेर हाकलुन दिलेले असल्यामुळे ते सर्वजण नाईलाजास्तव अर्जदार क्र.१ यांच्या माहेरी राहत आहेत. सर्व अर्जदारांना कपडलत्याची, औषधोपचाराची, खाण्यापिण्याची कोणतीही व्यवस्था गैरअर्जदार यांनी केली नाही. गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या त्यांच्या लेखी जबाबात (नि.क्र.१३) त्यांनी अर्जदारांची कोणतीही व्यवस्था केली आहे असे त्यांचे म्हणणे दिसून येत नाही. गैरअर्जदारातर्फे अर्जदार यांचा घेण्यात आलेल्या

उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार यांनी अर्जदाराची कपड्यालत्याची, औषधोपचाराची तसेच खाण्यापिण्याची व्यवस्था केली आहे याबाबत कोणतीही कबुली अभिलेखावर आलेली नाही. अर्जदार क्र.१ ही पत्नी आणि अर्जदार क्र.२ हा गैरअर्जदार यांचा मुलगा असल्यामुळे त्यांचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी ही गैरअर्जदार यांची आहे. सबब, गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचा सांभाळ करण्यास व उदरनिर्वाह करण्यास दुर्लक्ष केले आहे ही बाब शाबीत होत आहे. सबब, मुद्दा क्र.१ करीता निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत**

**१०.** अर्जदार यांना स्वतःचे उत्पनाचे साधन असल्याबाबत किंवा ती स्वतःचा उर्दनिर्वाह करण्यास समर्थ असल्याबाबत गैरअर्जदार याने कथन केलेले नाही, परंतु गैरअर्जदार यांनी असे कथन केलेले आहे की, गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ हिच्या नावे ०२ एक्कर शेती खरेदी करुन दिलेली असून त्यातील संपूर्ण नगदी पिकांचे येणारे उत्पन्न प्रति वर्षी दीड लाख रुपये अर्जदार स्वतः घेत आहे. सबब, अर्जदार यांना स्वतंत्र पोटगी देण्याची आवश्यकता नाही. गैरअर्जदारातर्फे अर्जदार यांच्या घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान चिंचवण येथे त्यांच्या नावे दोन एक्कर बागायत जमीन आहे तसेच त्यांच्या नावे असलेल्या जमीनीमध्ये सध्या ऊसाचे पिक उभे आहे अशी कबुली दिलेली आहे. अर्जदार यांनी उलटतपासा दरम्यान पुढे अशी कबुली दिलेली की, अर्जदार क्र.२ हा सध्या इ. ९वी मध्ये शिकत असून त्याचे शिक्षण व्यवस्थीत सुरु आहे. संतोष (सा.क्र.२) (नि.क्र.२६) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये अर्जदार ही चिंचवण गावामध्ये स्वतः काम करुन तिचे व्यवस्थीत पोट भरत आहे अशी कबुली दिली आहे. अर्जदार यांच्या नावे चिंचवण येथे दोन एक्कर शेती खरेदी करुन दिलेली आहे ही बाब सिद्ध करण्यासाठी गैरअर्जदार यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार क्र.१ यांच्या नावे दोन एक्कर शेत जमीन असून त्यामध्ये ऊसाचे पिक घेत आहे याबाबत अर्जदाराने कबुली दिलेली असल्यामुळे अर्जदार यांना उत्पन्नाचे साधन आहे असे दिसून येत आहे, परंतु अर्जदार क्र.१ यांच्या नावे असलेल्या शेत जमीनीमधून त्यांना किती प्रमाणात उत्पन्न होत आहे तसेच मिळणारे उत्पन्न पुरेसे आहे किंवा नाही याबाबत कोणताही पुरावा गैरअर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. सबब, मुद्दा क्र.२ करीता निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत</u>**

**११.** अर्जदार यांनी केलेल्या कथनानुसार गैरअर्जदार यांच्याकडे मौजे चिंचवण येथे एकत्र कुटुंबाची बागायती जमीन असून सदर जमीनीमध्ये ऊस, कापुस, तुर अशी नगदी पिके घेत असून गैरअर्जदार यांना त्यापासून वर्षाला नऊ ते दहा लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार यांच्या कडे पाच दुभत्या म्हशी असून त्यापासून वर्षाकाठी चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार हा ऊसतोड मजूर पुरविण्याचा मुकादम असून त्यापासून त्यांना वर्षाला तीन ते चार लाख रुपये उत्पन्न मिळते. अर्जदाराच्या पुराव्याचे तसेच मुळ अर्जाचे सखोल असलोन केले असता गैरअर्जदार यांच्याकडे चिंचवण गावामध्ये जी जमीन उपलब्ध आहे त्याचा गट नंबर अथवा अनुषंगीक तपशील नमूद केलेला नाही किंवा त्याकरीता ७/१२ उतारा नमूना ८–अ अथवा योग्य तो कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदार यांच्याकडे दुभत्या म्हशी आहेत तसेच ते ऊसतोड पुरविण्याचे मुकादम आहेत याबाबत कोणताही पुरावा अर्जदाराने दाखल केलेला नाही. अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान गैरअर्जदार हे कोणत्याही कारखान्याचे मुकादम नव्हते ही बाब कबुल केलेली आहे तसेच गैरअर्जदार हे त्यांचे लग्न होण्यापुर्वी मुकादम होते असे अर्जदाराने स्वतःहुन उलटतपासा दरम्यान कथन केले आहे, परंतु लग्नानंतर ते मुकादम म्हणून काम करीत होते किंवा नाही याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. सबब, गैरअर्जदार हे ऊसतोड पुरविण्याचे मुकादम आहेत हे विधान मोघम स्वरुपाचे दिसून येत आहे. सबब, गैरअर्जदार यांच्याकडे शेत जमीन उपलब्ध आहे, गैरअर्जदार हे मुकादम आहेत तसेच त्यांच्याकडे दुभत्या म्हशी असून त्यापासून त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे १८ ते १९ लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळते ही कथने मोघम असल्याचे दिसून येत आहे.

**१२.** याउलट गैरअर्जदार यांनी त्यांच्या लेखी जबाबामध्ये असे कथन केलेले आहे की, गैरअर्जदार यांनी अर्जदार, तिचे वडील आणि भाऊ यांच्यावर गैरअर्जदाराच्या नावावर असलेली दोन एक्कर जमीन वहिती करु देत नाहीत या कारणास्तव दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला असल्यामुळे त्याचा राग मनात धरुन अर्जदार हिने प्रस्तुत खोटा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान गैरअर्जदार यांनी त्यांच्या तसेच त्यांचे भाऊ यांच्या विरुद्ध ते गैरअर्जदार यांच्या वहितीस अडथळा करतात या कारणास्तव दिवाणी न्यायालयत दावा दाखल केलेला आहे ही बाब कबुल केलेली आहे. गैरअर्जदार यांच्या

नावे शेत जमीन उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार किंवा गैरअर्जदार यांनी दाखल केलेला नाही, परंतु वर नमूद कथनावरुन असे दिसून येत आहे की, गैरअर्जदार यांच्या नावे दोन एक्कर जमीन उपलब्ध आहे. गैरअर्जदार यांच्याकडे शेत जमीन जरी उपलब्ध असली तरी त्या जमीनीतुन उत्पन्न घेण्यास अर्जदार हे गैरअर्जदार यांना अडथळा करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

**१३**. यापुढे असे की, गैरअर्जदार यांना कोणत्याही प्रकारचे शारिरीक अगर मानसिक अपंगत्व आहे असे कोणाचेही म्हणणे नाही. तथापि शासकीय नियमाप्रमाणे अकुशल कामगाराचे किमान वेतन हे रुपये ३००/– ते ४००/– प्रतिदिन एवढे आहे. त्याची न्यायीक नोंद भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ५७ प्रमाणे घेता येईल. अशाप्रकारे या बाबी व त्याचे वय विचारात घेता त्याने किमान मोलमजुरी केली तरी तो मोल मजुरीपासून दररोज रु.३००/– ते रु.४००/– म्हणजेच दरमहा सुमारे रु.९०००/– ते रु.१२,०००/– कमावितो, असा निष्कर्ष काढता येईल. त्यामुळे गैरअर्जदार यांचे उत्पन्न हे अर्जदारांस दरमहा आर्थिक मदत देण्यास पुरेसे आहे आणि ते अर्जदारांस पोटगी देण्यास समक्ष आहेत, असा निष्कर्ष निघतो. सबब, मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष 'अंशतः होकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत**

**१४.** गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन असून तो अर्जदारांना पोटगी देण्यास सक्षम आहेत. सध्या अर्जदार हे वेगळे राहत असल्याचे त्यांनी अर्जात कथन केले आहे. गैरअर्जदार यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असून त्यांनी अर्जदारांचे पालण–पोषण करण्यास दुर्लक्ष केलेले आहे. अर्जदार यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ मधील तरतुदीनुसार पत्नी, अज्ञान अपत्ये यांना भरण–पोषणाकरीता पोटगी मिळण्याची तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार जी पत्नी स्वतःची देखभाल करु शकत नाही आणि जिच्या पतीने त्यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असूनही पत्नीकडे दुर्लक्ष केले अशा पत्नीस पोटगी मिळविण्याचा अधिकार आहे सबब, अर्जदार क्र.१ यांना गैरअर्जदार यांच्या कडुन पोटगी मिळविण्याचा अधिकार आहे.

**१५.** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ मधील तरतुदीनुसार अल्पवयीन अपत्ये जी स्वतःचा देखभाल करु शकत नाहीत अशा अपत्यांना पोटगी मिळविण्याचा अधिकार आहे. सबब, अर्जदार क्र.२ हा अज्ञान आहे त्या कालावधीपर्यंत गैरअर्जदार

यांच्याकडुन पोटगी मिळविण्यास पात्र आहेत. सदर प्रकरणामधील अर्जदार क्र.२ अभिषेक यांचे आज रोजीचे वय १७ वर्षे असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. थोडक्यात, अर्जदार क्र.२ हा आज रोजी अज्ञान आहे. सबब, अर्जदार क्र.२ यास अज्ञान आहे त्या कालावधीपर्यंत पोटगी मिळविण्याचा अधिकार आहे.

**१६.** सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार यांचे असे कोठेही म्हणणे दिसून येत नाही की, अर्जदार यांना स्वतंत्र उत्पन्नाचे साधन आहे, परंतु त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ यांच्या नावे दोन एक्कर शेती करुन दिलेली आहे जी बाब अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान मान्य केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता आणि दायित्व शपथपत्र (नि.क्र.३१) दाखल केलेले आहे, परंतु त्यामध्ये दोन एक्कर शेतीबाबत कोणताही उल्लेख केलेला दिसून येत नाही. अर्जदाराचे विधीज्ञ श्री. बी. के. तिडके यांनी असा युक्तीवाद केला की, दोन एक्कर शेती अर्जदाराच्या नावे करुन दिलेली आहे, परंतु ती जमीन गैरअर्जदार यांनी दिलेली नसून अर्जदार आणि गैरअर्जदार यांच्या आजीने अर्जदाराच्या नावे करुन दिलेली असल्यामुळे गैरअर्जदाराचा त्या जमीनीशी कोणताही संबंध नाही (अर्जदार क्र.१ यांची आई आणि गैरअर्जदार यांचे वडील हे सख्खे बहिण–भाऊ आहेत). या ठिकाणी हे विचारात घेणे आवश्यक आहे की, अर्जदार क्र.१ यांच्या नावे दोन एक्कर शेती आहे ही बाब त्यांनी उलटतपासात कबुल केलेली असूनही त्यानंतर दाखल केलेल्या मालमत्ता आणि दायित्व शपथपत्रामध्ये (नि.क्र.३१) त्या जमीनीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. थोडक्यात, अर्जदार क्र.१ यांच्या नावे दोन एक्कर शेती आहे ही बाब अर्जदार क्र.१ यांनी स्वतः उघड केलेली दिसून येत नाही. गैरअर्जदार यांनी कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केलेला नसल्यामुळे गैरअर्जदार यांनी कथन केल्याप्रमाणे कोणती जमीन अर्जदार क्र.१ यांच्या नावे करुन दिलेली आहे तसेच त्या जमीनीमधून अर्जदार यांना किती उत्पन्न मिळते याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही किंवा तसा पुरावा अभिलेखावर दाखल करण्यासाठी गैरअर्जदार यांनी कोणतेही प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. अर्जदार क्र.१ यांच्या नावे असलेल्या शेतीमधुन त्यांना किती उत्पन्न मिळते व ते उत्पन्न त्यांचे सर्व खर्च भागविण्यास पुरेसे आहे किंवा नाही या बाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**१७.** याउलट, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ हा अर्जदार क्र.१ आणि गैरअर्जदार यांचा मुलगा आहे. गैरअर्जदार यांचे उत्पन्न हे अर्जदार यांना

दरमहा आर्थिक मदत देण्यास पुरेसे आहे, परंतु अर्जदाराच्या दैनंदिन गरजा, औषधोपचार या करीता अर्जदारांना स्वतंत्र पुरेसा उत्पन्नाचा मार्ग नाही. अर्जदारांचे आणि गैरअर्जदार यांचे रहाणीमान, उत्पन्न, वाढती महागाई हे सर्व मुद्दे एकत्रीत विचारात घेता गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ यांना दरमहा रक्कम रु.१,०००/– (रुपये एक हजार फक्त) पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासून देण्याचा आदेश करणे रास्त व न्याय्य राहील. तसेच, अर्जदार क्र.२ यास दरमहा रक्कम रु.५००/– (रुपये पाचशे फक्त) पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासून तो अज्ञान आहे त्या कालावधी पर्यंत देण्याचा आदेश करणे रास्त व न्याय्य राहील. सबब, मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष 'अंशतः होकारार्थी' नोंदवुन मुद्दा क्र.५ करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुत अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार क्र.१ यांना दरमहा रु.१,०००/– (अक्षरी रुपये एक हजार मात्र) रक्कम पालन पोषणाकरीता पोटगी म्हणून दयावी.

३. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार क्र.२ यास दरमहा रु.५००/– (अक्षरी रुपये पाचशे मात्र) रक्कम पालन पोषणाकरीता पोटगी म्हणून दयावी.

४. अर्जदार क्र.२ सज्ञान होईपर्यंत म्हणजेच वय वर्ष १८ पुर्ण होईपर्यंत या मर्यादित कालावधी करीता मंजूर करण्यात आलेली असून अर्जदार क्र.२ सज्ञान झाल्याच्या दिनांकानंतर त्यांना गैरअर्जदार यांच्याकडुन पोटगी मागण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

५. गैरअर्जदार याने अर्जदारांना अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु.२,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) या आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत द्यावे.

६. सदर निकालाची एक प्रत अर्जदारास मोफत देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.03.30 17:23:33 +0530

दिनांक : ३०/०३/२०२६.

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडवणी,**
**जि. बीड.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी वर्ग-१, वडवणी. |
| लघुलेखकाचे नाव | :- | राजेश आर. कुलकर्णी |
| घोषित दिनांक | :- | ३०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ३०/०३/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ३०/०३/२०२६ |